EAU/100/2017-18/ 286
12/2/2018
14/2/18

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

मसुदा
क्र. /२०१७–१८

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा ***गुरुवार, दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी दुपारी २.०० वाजता*** सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते:—

| | | |
|---|---|---|
| १. डॉ. देवानंद शिंदे (कुलगुरू) | — | अध्यक्ष |
| २. डॉ. विष्णू मगरे (प्र—कुलगुरू) | — | सदस्य |
| ३. श्री. दिपककुमार मुकादम | — | सदस्य |
| ४. डॉ. मुरलीधर कु—हाडे | — | सदस्य |
| ५. डॉ. (रश्मी ओझा) | — | सदस्य |
| ६. प्रा. डॉ.गौतम गवळी | — | सदस्य |
| ७. डॉ. अभय वाघ (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय) | — | सदस्य |
| ८. डॉ. दिनेश कांबळे (कुलसचिव) | — | सदस्य सचिव |
| ९. श्री. विजय तायडे (वित्त व लेखा अधिकारी) | — | निमंत्रित |
| १०. डॉ. अर्जुन घाटुळे (संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | — | निमंत्रित |

➢ **स्वागत :—**

कुलसचिवांनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३० (४) (सी) अन्वये मा. कुलपतींनी श्री. दिपककुमार मुकादम यांचे व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन केल्याबद्दल व्यवस्थापन परिषदेतर्फे त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले. कुलसचिवांनी श्री. मुकादम यांचा परिचय करुन देताना सांगितले की, विद्यापीठाच्या वित्तीय अर्थसंकल्प, प्रशासन व परिक्षेसंबंधी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. तसेच, मुंबई विद्यापीठास दिडशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सादरीकरणामध्ये गरवारे समुह व गोदरेज समुह अशा मोठया उद्योजकांबरोबर चर्चा करण्यासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. परिक्षा सुधारणा समिती, दक्षता समिती, सत्य शोधन समिती, दूरध्वनी नियंत्रण समिती, सल्लागार समिती अशा विविध समित्यांवर सदस्य म्हणून त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे.

बोर्ड ऑफ गर्व्हनर्स, आय.आय.एम. व आर.ए. विद्यालय घाटकोपर येथे मेंबर ऑफ गर्व्हनिंग कौन्सिलिंग, विविध एन.जी.ओ., उत्थन विविध लक्षी शिक्षण संस्था (यु.व्ही.एल. एस.एस.), शंकर मोती चॅरिटेबल ट्रस्ट, जमनाबाई सुंदरदास उखेडा ट्रस्ट (S.R.U.A.N.) अशा अनेक संस्थांवर त्यांनी विश्‍वस्त म्हणून काम केले असून काही संस्थावर ते कार्यरत आहेत.

उत्कृष्ट उद्योजक म्हणून जयबी स्टील ट्रीटर्स प्रा.लि., महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड येथे संचालक पदी ते कार्यरत आहेत. यु.एस.ए., स्वित्झर्लंड, जर्मनी, फ्रान्स, थायलंड, यु. के. अशा विविध देशात उद्योंगासंबंधी त्यांनी भेटी दिलेल्या आहेत. रिकव्हरी कमिटी व लोन कमिटीचे चेअरमन अशा अनेक पदांवर त्यांनी जनकल्याण सहकारी बँकेत कार्य केलेले आहे.

तसेच, जळगाव जनता सहकारी बॅकेत लोकपाल म्हणून काम केले आहे. इन्डो ऑस्ट्रेलियन सोसायटीचे ते आजीवन सदस्य आहेत. असे विविध अंगी अभ्यासू व अष्टपैलू व्यक्तिमत्वाची व्यवस्थापन परिषदेत नेमणूक झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले व कुलगुरुंच्या हस्ते स्मृतीचिन्ह व पुस्तके देवून त्यांचा सन्मान करण्यात आले.

डॉ. अभय वाघ, संचालक (तंत्र शिक्षण संचालनालय) यांचे बद्दल बोलताना कुलसचिव म्हणाले की, डॉ. वाघ हे तंत्र शिक्षण, वित्त व प्रशासनाचा दांडगा अनुभव असलेले व्यक्तिमत्व आपल्याला लाभले आहेत. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेत त्यांच्या ज्ञानाचा चांगला उपयोग होईल. कुलगुरुंच्या हस्ते त्यांना स्मृतीचिन्ह व पुस्तक देवून सन्मानीत करण्यात आले.

➢ **श्रध्दांजली:—**

**ॲड. मधूकरराव किंमतकर**

विदर्भ अनुशेषाचे गाढे अभ्यासक, वैधानिक विकास महामंडळाचे सदस्य तथा माजी राज्यमंत्री ॲड. मधूकरराव किमंतकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षाचे होते.

**श्री. वसंत डावखरे**

महाराष्ट्राच्या राजकारणात अजातशत्रू अशी ओळख असलेले विधान परिषदेचे माजी उपसभापती आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री. वसंत डावखरे यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०४ जानेवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षाचे होते.

**डॉ. तुलसी बेहेरे**

लोककला व दशावताराचे गाढे अभ्यासक डॉ.तुलसी बेहेरे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०६ जानेवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षाचे होते.

मुंबई विद्यापीठात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांचे या काळात निधन झाले त्यांनाही श्रध्दांजली वाहण्यात आली.

**बाब १ : दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करण्यात आले.

दुरूस्ती १- पान क्र. ३, बाब क्र. ६, दुसरा परिच्छेद व दुसरी ओळ.
"४० हजार" ऐवजी "४० हजार (४ हजार प्र.म. x १० विद्यार्थी)" असे वाचावे.

दुरूस्ती २- पान क्र. ६, बाब क्र. १४ तिस—या परिच्छेदाचा समावेश करावा.
चर्चेच्या अनुषंगाने प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाने अशा प्रकारचे केंद्र सामाजिक कायम सलोखा राखण्याच्या दृष्टीने विद्यापीठात स्थापन करणेबाबत विद्यापीठाने विचार करावा, असे मत प्रा. डॉ. गौतम गवळी यांनी व्यक्त केले. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

**बाब २ : दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेचा कार्यवाही अहवाल सादर.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी व्यवस्थापन परिषदेत झालेल्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

**बाब ३ : वित्त व लेखा समितीच्या दिनांक १५ जून, २०१७ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

ठराव : सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आली की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक १५ जून, २०१७ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तातील बाब क्र. ७ बाबत Mumbai School of Economics & Public Policy बॅन्क/खाते लेखा संहितेनुसार उघडण्यात आले आहे काय? हे तपासून घ्यावे व इतिवृत्त वित्त व लेखा समितीकडे परत पाठविण्यात यावे.

**बाब ४ : दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या विद्वत परिषदेच्या बैठकीत पारित झालेले ठराव मान्यतेसाठी.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी विद्वत परिषदेत बाब क्र.४.२, ४.३ व ७.१ अन्वये केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या.

**बाब ५ : शैक्षणिक वर्ष २०१८—१९ पासून नवीन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, वास्तुशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र) सुरु करण्याकरिता इरादापत्रासाठी इच्छुक संस्थांकडून विद्यापीठ फेर जाहिरात दिनांक ५ डिसेंबर, २०१७ व मुंबई विद्यापीठाच्या बृहत् आराखडयानुसार प्राप्त झालेले प्रस्ताव.**

ठराव : मुंबई विद्यापीठ कार्यक्षेत्रात नवीन महाविद्यालये (पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता) कला, वाणिज्य, विधी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र सुरू करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ व अध्यादेश क्र. २८/२०१७ मधील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय क्र. एनजीसी२०१७/(२९/१७)/मशि—४ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ व उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.बृआमा—२०१६/प्र.क्र.४६३/विशी—३ दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ तसेच पत्र क्र.बृआमा—२०१७/प्र.क्र.३७६/विशी—३ दिनांक ३० नाव्हेंबर, २०१७ नुसार शैक्षणिक वर्ष २०१८—१९ करिता बृहत आराखडयास महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मंजुरीनुसार विद्यापीठाच्या फेर जाहिरातीस अनुसरून दिनांक ५ डिसेंबर, २०१७ अन्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर इरादापत्र देण्याकरिता छाननी समिती, तज्ञ समिती, अधिष्ठाता मंडळ व कुलगुरूंचे अंतिम निर्णय विचारात घेऊन व्यवस्थापन परिषदने (परिशिष्ठ—अ प्रमाणे) २५ संस्थांच्या प्रस्तावित महाविद्यालयांचे **पात्र प्रस्ताव** व अनु.क्र. ६, १७, २६ या तीन संस्थांच्या प्रस्तावित महाविद्यालयांचे प्रस्ताव **अपात्र** करून, केवळ पात्र प्रस्ताव सकारात्मक शिफारशीसह शासनाकडे सादर करण्यास मंजुरी देण्यात आली.

तसेच, चर्चेच्या अनुषंगाने असे ठरले की, कलम ११२, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार स्कील कॉलेजस्, खाजगी कौशल्य शिक्षण प्रदान संस्था, कम्युनिटी कॉलेजस् यांचा प्रचार व प्रसार करण्यसाठी नेमके अभ्यासक्रम काय असावेत? कोणती पदवी देण्यात यावी? स्कील कोर्स प्रोव्हायडर कोणते असावेत? या संबंधीचा आढावा घेवून अहवाल तयार करण्यासाठी डॉ.व्ही.एन.मगरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. जे व्यवस्थापन परिषद, विद्वत परिषद व अधिसभेचे तांत्रिक ज्ञान असलेले सदस्य असतील व त्यांची नावे सुचविण्यांचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. पुढील वर्षी बृहत आराखडयामध्ये सदर प्रस्तावांचा समावेश असावा. सदर समिती प्रस्ताव कसा पाठवावयाचा यासंदर्भात कार्यशाळा घेण्याबाबतही handful member of TOT इत्यादीबाबत मार्गदर्शन करेल.

बाब ६ : **Request of the Principal, Birla College of Arts, Science & Commerce, Kalyan, Birla College Road, Kalyan, Thane – 421 304 to change the name of the college from "Birla College of Arts, Science & Commerce, Kalyan; conducted by Kalyan Citizens' Education Society) to B. K. Birla College of Arts, Science & Commerce, Kalyan.**

ठराव : It was resolved that the request of the Kalyan Citizens' Education Society to change the name of their college from "Birla College of Arts, Science & Commerce, Kalyan to "B. K. Birla College of Arts, Science & Commerce, Kalyan" be accepted in principle and confirmed after verification of necessary documents/certificates.

Arising out of discussion it was resolved that the committee be constituted to prepare fresh guidelines/procedures to be followed by the Colleges/Institutes and University regarding change of their name (including provisions for seeking no dues certificate on account of affiliation, enrollment, exam, sports fees, etc. court cases and grievances):-

| | | |
|---|---|---|
| 1. | Dr. Rashmi Oza, Dean and Head, Law Department, | Convener |
| 2. | Dr. Abhay Wagh, Director, Tech. Education, | Member |
| 3. | Dr. Shefali Pandya, (AC) Dept. of Education | Member |
| 4. | Prin. Fulzele, Shahapur College, | Member |
| 5. | Shri. Rahul Jadhav, Vartak College | Member |
| 6. | Prin. Tushar Desai, Ruparel College | Member |

Further, it was also resolved that the same committee be asked to devise the format and guidelines for shifting of the College/Institutes from one place to another in consonance with Section 118 of the Maharashtra Public Universities Act, 2016.

The Committee be requested to give two different reports on the above subject matter.

बाब ७ : **Report of the committee appointed by the University for closure of Master in Management Studies (60-0) from the Academic year 2017-18 of the VIVA Institute of Management Studies, At –Shirgaon, Post –Virar, Tal.–Vasai, Dist.-Palghar- 401 305.**

ठराव : It was observed that the advertisement for the teaching posts was appeared in the Newspaper regarding Master of Management Studies Course. The same be checked.

After detailed discussion, it was also resolved that the following committee be constituted to prepare the procedure, format and guidelines for the closure of college.

1. Shri Deepakkumar Mukadam, Convener,
2. Dr. Chandrahauns Chavan, Director, JBIMS, Member,
3. Prin. Dr. T.P.Madhu Nair (Nirmal College, Member),

The committee be authorized to co-opt some experts in the Committee.

बाब ८ : **Election of the Students' Council for the academic year 2017-18 and Formations of Selection Committee for scrutinizing the forms received from secretaries of the Students' Council under the provisions of Section 40(2)(a), 40(2)(b) and 40 (4)(a) of the Maharashtra Public Universities Act, 2016 and Ordinance XXVIII of 2017, dated 28th November, 2017 and Government Resolutions dated 30th November, 2017.**

ठराव : It was resolved that the timetable for election programme for Election of the Students' Council for the academic year 2017-18 and Formations of Selection Committee for scrutinizing the forms received from Secretaries of the Students' Council under the provisions of Section 40(2)(a), 40(2)(b) and 40 (4)(a) of the Maharashtra Public Universities Act, 2016 and Ordinance XXVIII of 2017, dated 28th November, 2017 and Government Resolutions dated 30th November, 2017 be noted and accepted.

बाब ९ : **The Government Resolutions** क. केंद्रीय —२०१७/प्रा.क.६८/का—१९ दिनांक २९ ऑगस्ट, २०१७, क. केंद्रीय—२०१७/प्रा.क.६६/का—१९, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ व क. केंद्रीय—आदिम—२०१७/ प्रा.क.७२/का—१९, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ **respectively regarding the Mumbai School of Economics & Public Policy (Autonomous) for consideration.**

ठराव : सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. केंद्रीय—२०१७/प्रा.क्र.६८/का—१९, दिनांक २९ ऑगस्ट, २०१७, क्र.केंद्रीय—२०१७/प्रा.क्र.६६ /का—१९, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ व क्र.केंद्रीय—आदिम—२०१७/प्रा.क्र.७२/का—१९, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ ची नोंद घेण्यात यावी. सदर शासन निर्णयातील पृष्ठ क्रमांक ४ व ५ मध्ये सुकाणू समितीवर पदसिध्द सदस्य म्हणून मुंबई विद्यापीठातील कुलगुरु, प्र—कुलगुरु, कुलसचिव यांचा समावेश करणेबद्दल शासनास कळविण्यात यावे. मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अॅन्ड पब्लिक पॉलिसी हा विभाग मुंबई विद्यापीठाचा एक भाग असल्याने "मुंबई विद्यापीठ, मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अॅन्ड पब्लिक पॉलिसी" असा उल्लेख करणेबाबत, शासनास कळविण्यात यावे.

समितीवरील कोणत्याही प्राध्यापकाचे नामनिर्देशन हे तो प्राध्यापक सेवेत असेपर्यंत असेल याचा स्पष्ट उल्लेख शासन निर्णयात करण्यात यावा, असेही शासनास कळविण्यात यावे.

बाब १०: **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये कलम ३०(४), ६२(२), ९९, १०९(३) व १४६ (१) मध्ये सुधारणेबाबतचा अध्यादेश व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव व विचारार्थ सादर.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४), ६२(२), ९९, १०९(३) व १४६ (१) मध्ये सुधारणेबाबत निर्गमित केलेला अध्यादेश क्र. बृआमा—२०१७/प्र.क्र.३७६/ विशि—३, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ ची नोंद घेण्यात आली.

बाब ११ : **MOU between Observer Research Foundation, Mumbai (ORF) & MSE – PP for consideration.**

ठराव : After detail discussion, it was resolved that, MOU between Observer Research Foundation, Mumbai (ORF) & University of Mumbai's Mumbai School of Economics and Public Policy (MSE – PP) be not accepted at this stage as the Department does not have administrative and Financial autonomy.

Further, it was resolved that the high power committee consisting of the following member be constituted to examine the MOU :-

1. Shri Deepakkumar Mukadam - Convener
   (Chancellor's nominee on the Management Council),
2. Dr. Prin. M. Kurhade
   (Management Council Member) - Member
3. Prof. Gautam Gawli
   (Management Council Member) - Member

बाब १२ : **Minutes of the Board of Management of MSE-PP held on 30th October, 2017 for consideration.**

ठराव : It was resolved that, the minutes of the Board of Management of MSE-PP held on 30th October, 2017 be referred back for re-examination.

बाब १३ : **मुंबई विद्यापीठातील किंवा शासनातील निवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण – २७१५/प्र.क्र. १००/१३, दिनांक ८ जानेवारी, २०१६ विचारार्थ सादर.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, निवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण – २७१५/प्र.क्र. १००/१३, दिनांक ८ जानेवारी, २०१६ ची नोंद घेण्यात आली व सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहून निवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यात याव्यात.

असाही ठराव करण्यात आला की, सेवेत येणा–या कर्मचा–यांना किमान वेतन अधिनियमानुसार किमान वेतन देण्यात यावे व सद्या आस्थापनावर जे अस्थायी कर्मचारी चांगले काम करतात व पात्र आहेत, त्यांचेबाबत संबंधीत विभागाचा अभिप्राय घेवून अशा अस्थायी कर्मचा–यांची नियुक्ती एजन्सीमार्फत करण्यात यावी व त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

बाब १४ : **रुसा सेल (RUSA Cell) मधे विशेष कक्षाची निर्मिती करणेबाबत.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, रुसा सेल (RUSA Cell) मधे विशेष कक्षाची निर्मिती करण्याबाबत रुसा सेल समन्वयकाने रुसा सेल मध्ये येणारा निधी, कामाचे स्वरुप व निधीचा विनियोग याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

**बाब १५ : कौशल्य असलेल्या सल्लागार सेवा पुरवठा करणा–या संस्थाच्या नेमणुकीबाबतचा शासन निर्णय क्र. खाक्षेप–२०१५/प्र.क्र.२०९/रस्ते–९अ, दिनांक २४.०१.२०१७ विचारार्थ सादर.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, कौशल्य असलेल्या सल्लागार सेवा पुरवठा करणा–या संस्थांच्या नेमणूकीबाबत शासन निर्णय क्र.खाक्षेप–२०१५ /प्र.क्र. २०९/रस्ते–९अ, दिनांक २४ जानेवारी, २०१७ स्विकारण्यात यावा.

**बाब १६ : विद्यापीठातील केंद्रीय संगणक विभाग (सी.सी.एफ.) या विभागात कार्यरत असलेल्या सिनियर सिस्टिम प्रोग्रामर या पदांना वेतन बॅड ३७४००– ६७००० ग्रेड पे रु.८७०० देणेबाबत.**

ठराव : सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील केंद्रीय संगणक विभाग (सी.सी.एफ.) या विभागात असलेल्या सर्वच तांत्रिक पदाबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाची मूळ योजना, प्रत्येक पदासाठी यु.जी.सी.ने निश्चित केलेली अर्हता, अनुभव, वेतनश्रेणी व सेवेत असलेल्या कर्मचा–यांच्या अर्हता व अनुभव याचा सखोल अभ्यास करण्यासाठी श्री. दिपककुमार मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात यावी. समितीच्या इतर सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.

समितीने एक महिन्यात अहवाल सादर करावा.

**बाब १७ : मुंबई विद्यापीठाचे २०१७–२०१८ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज व २०१८–२०१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजासाठी तपासणी समिती गठीत करणेबाबत.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, सन २०१७–२०१८ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज व २०१८–२०१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या खालील अंदाजपत्रक तपासणी समितीस मान्यता देण्यात आली.

१. डॉ. (श्रीमती) रश्मी ओझा (निमंत्रक),
२. डॉ. दिनेश कांबळे,
३. प्रा. डॉ.शेफाली पंडया,
४. डॉ. एम.एम.व्ही. रामणा,
५. डॉ. अजय भामरे,
६. श्री. रुपेश मालुसरे,
७. श्री. विजय फ. तायडे
(वित्त व लेखा अधिकारी, तथा सदस्य सचिव अंदाजपत्रक तपासणी समिती)

चर्चेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सूचनांवर खालील ठराव पारित करण्यात आले.

अ. **संलग्नित महाविद्यालयातून जे प्राध्यापक/रिसर्चर मुंबई विद्यापीठाचे अनुदान घेवून प्रोजक्टस् संशोधन पेपर करतात त्यांनी त्यांच्या प्रोजेक्टस् संशोधनाच्या प्रकाशनातून मुंबई विद्यापीठाच्या नावाचा उल्लेख करावा, अशी सूचना प्रा. गौतम गवळी यांनी केली.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, प्रा.डॉ.गौतम गवळी यांनी केलेल्या सूचनेनुसार संलग्नित महाविद्यालयातून जे प्राध्यापक/रिसर्चर जे मुंबई विद्यापीठाचे अनुदान घेवून प्रोजक्टस् संशोधन पेपर करतात, त्यांनी त्यांच्या प्रोजेक्टस्/संशोधनाच्या प्रकाशनामध्ये मुंबई विद्यापीठाच्या नावाचा उल्लेख करावा व विद्यापीठातील संबंधित विभागाने सर्व महाविद्यालयांना याबाबत सूचना द्याव्यात.

ब. **हिरवळ एज्युकेशन संस्थेच्या महाविद्यालयाच्या ठिकाण बदलण्याच्या प्रस्तावाबाबत नवीन सदस्यांची नावे घेण्यात यावी, अशी सूचना प्राचार्य कु—हाडे यांनी केली.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, हिरवळ एज्युकेशनच्या महाविद्यालयाच्या ठिकाण बदलण्याच्या प्रस्तावाबाबत डॉ. मुरलीधर कु—हाडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने नवीन सदस्य नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात यावेत.

क. **कोणताही सामंजस्य करार संबंधित प्राधिकरणाच्या परवानगीनेच स्विकारावा, अशी सूचना डॉ. अभय वाघ यांनी केली.**

ठराव : डॉ. अभय वाघ यांनी केलेल्या सूचनेनुसार असा ठराव करण्यात आला की, सर्व स्वायत्त विभाग व इतर विभाग यांनी कोणताही सामंजस्य करार करताना संबंधित प्राधिकरणाची परवानगी घ्यावी. सर्व संबंधितांना याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात यावे.

डॉ. अभय वाघ म्हणाले की, संचालक पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर त्यांना दिड महिन्यात जाणवले की, महाराष्ट्रातील सर्व अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) महाविद्यालयांमध्ये भरपूर जागा रिक्त आहेत व आज आमच्या समोर आव्हान आहे की, विद्यार्थ्यांची संख्या कमी का होत आहे? यात आठ—दहा मुद्दे येतात. त्यातील सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) क्षेत्रातील रोजगार दिवसें—दिवस कमी होत आहेत. अकॅडेमिकपासून क्वालिटीपर्यंत सगळेच आठ—दहा मुद्दे चर्चेला येतात. सर्वप्रथम विद्यापीठाचा जो अभ्यासक्रम आहे तो इंडस्ट्रीशी समन्वयाने एक टेलरमेड प्रोग्रॅम असणे आवश्यक आहे; जिथे प्राध्यापक त्यांच्याशी संवाद साधतील. आज इंडस्ट्रीमध्ये डिमांड ड्रिव्हन अशी कन्सेप्ट झालेली आहे, त्यानुसार आपण चांगला अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक आहे. याबाबत १ जून पासून एक वर्ष एमएसबीटीई मध्ये काम करताना अतिशय चांगल्या अभ्यासक्रमाची सुरुवात केली ज्यात ५० इंडस्ट्री अंर्तभूत होत्या. उदा. महेंद्रा ॲन्ड महेंद्रा, रिलायन्स व काही छोटया उद्योगांना अंर्तभूत करुन घेतले होते. एआयसीटीईने इंजिनिअरिंगच्या बाबतीत नवा अभ्यासक्रमाचा (मॉडेल अभ्यासक्रम) मसुदा त्यांच्या वेबसाइटवर टाकला आहे.

याबाबत त्यांनी मा. कुलगुरुंना विनंती केली की, मुंबई विद्यापीठाचा अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) अभ्यासक्रम बोर्ड ऑफ स्टडीज, फॅक्ल्टी, बोर्ड ऑफ डीन व विद्यापरिषद यांच्या मार्फत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार त्या त्या प्राधिकरणांस तशा सूचना प्रशासनाने दिल्या तर एक मॉडेल करिकुलम बनविण्याच्या दृष्टिने हालचाल सुरु होईल व परिणामकारकपणे काम करता येईल.

दुसरा मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांना इंटर्नशीप असली पाहिजे; आता ती एआयसीटीई ने अनिवार्य केलेली आहे. त्याला गुण (क्रेडिट) असले पाहिजे जेणेकरुन तो व्यवस्थित करतो किंवा नाही, हे तपासता येईल. अभियांत्रिकी क्षेत्रातील गुणवत्तेबाबत सर्व कुलगुरु, कुलसचिव व डिन यांना सूचना देण्यात आल्या तर पर्यायाने महाराष्ट्रात अभियांत्रिकी क्षेत्रात चांगल्या संधी निर्माण होवू शकतील.

नवीन/आर्दश अभ्यासक्रमामध्ये मानसशास्त्र उपयोजित, स्पिरिच्युअल व्हॅल्युज, टच हयुमन रिलेशन इत्यादींचा अंर्तभाव करण्यात यावा.

तंत्रशिक्षणाचे संचालक म्हणून योग्य पध्दतीने मत मांडून मोलाचा सल्ला दिल्याबद्दल कुलगुरुंनी त्यांचे आभार मानले.

याबाबत असा ठराव करण्यात आला की, संचालकांनी केलेल्या सूचनेनुसार विद्यापीठातील सर्व संबंधित प्राधिकरण सदस्यांची बैठक बोलविण्यात यावी व सदर बैठकीस संचालक, तंत्र शिक्षण यांना बोलविण्यात यावे.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करून अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे कुलसचिवांनी घोषित केले.

S.K.Sawant 12/02/18

सहायक कुलसचिव

कुलसचिव
१५/२/१८

१६/२/१८
प्र-कुलगुरू

16.2.18
कुलगुरू